# बर्णबा व पौल ह्यांच्याप्रमाणे एकत्रित येऊन आपल्या प्रभूची सेवा करा

*मुलांना शिकवणाऱ्यांनी T2b ह्या अभ्यास वाचावा.*

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू, येशू आणि त्याच्या शिष्यांनी ज्याप्रमाणे आपले प्रयत्न एकत्रित करून एक चमूप्रमाणे कार्य केले, यावर आमचा विश्वास आहे. त्यांच्याप्रमाणे कार्य करण्यास आमचे सहाय्य कर.''*

*तुमच्या लोकांच्या सध्याच्या गरजा, स्थानिक रिवाज आणि देवाने विश्वासणाऱ्यांना दिलेली क्षमता हांना अनुरूप अशा कार्यक्रमांची निवड करा.*

## १. विश्वासणाऱ्यांना एकत्रितपणे कृती गटांमध्ये सेवा करण्यास सहाय्य करता यावे या साठी देवाच्या वचनाच्या द्वारे तयारी करा.

### १अ) बर्णबा हा सगळयांना बरोबर घेऊन काम करणारा होता

*बर्णबाला लोकांच्या गरजांबद्दल आस्था होती आणि त्याने लोकांना एकात्रतपणे कार्य करण्यासाठी एकत्र केले. लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्याने काय केले ते* **प्रे.कृ.४:३४-३७** *ह्या वचनांत पाहा.*

*पौलाचा सहकारी म्हणून स्विकार करण्यासाठी त्याने यरूशलेममधील विश्वासणाऱ्यांना कसे साहाय्य केले ते* **प्रे.कृ. ९:२६-२९** *ह्या वचनांत पाहा.*

*अत्युंखियाच्या मंडळीने पाठवलले बर्णबाचे आणखी दोन सहकारी कोण होते ते* **प्रे.कृ.१३:२-५** *ह्या वचनांत पाहा.*



**प्रेषित सर्वसाधारणपणे जोडीने वा गटाने प्रवास करीत.**

### १ब) शास्त्रलेखातील सांघिक व वैयक्तिक प्रयत्न

**मोशेने** *इस्राएलच्या वंशातील वडिलजनांबरोबर एकजूटीने काम केले आणि देवाने त्याचा महान रितीने उपयोग करून घेतला. तथापि, त्याने इतर वडिलजनांना बाजूला ठेवून एकटयाने काम केले तेव्हा त्याने लोकांचा रोष ओढावून घेतला आणि देवाने पाणी देण्याचे अभिवचन दिलेले असतानाही रागाने खडकावर काठी आपटली (गणना २०:२-१२) तेव्हां देवाने त्याला शिक्षा केली.*

**दावीद राजाने** *सैनिक, याजक व संदेष्टे यांच्या बरोबर एक जूटीने काम केले आर्णइ देवाने त्याचा महान रितीने उपयोग करून घेतला. एकटयाने आपल्याच मनाने काम केले तेव्हा त्याने उरियाला जिवे मारून त्याच्या पत्नीला जवळ केले आणि देवाने त्याला शिक्षा केली (२ शमुवेल अध्याय ११:१२). एकटयाने काम करताना, संघटित राज्यातील उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील वंशाचे सामर्थ्य पाहण्यासाठी सैन्यातील लोकांची मोजदाद करण्याचा मूर्खपणा दाविदाने केला आणि देवाने त्याला शिक्षा केली (२ शमुवेल २४).*

**यहोशाफाट राजाने** *निर्णय घेण्यासाठी प्राचीन इस्राएलमधील देवाच्या संदेष्टयांशी चर्चा केली. गावोगाव जाऊन देवाचे वचन शिकवण्यासाठी त्याने अधिकाऱ्यांचा एक चमूही पाठवला (२ इतिहास १७:७-९). तथापित, इतर राजांनी आपल्याच मनाने काम*

*करून मूर्खपणाचे निर्णय घेतले, जसे अहाबाने यहोशाफाटला सांगितले की तो वेष बदलून शुध्द करण्यास येईल (१ राजे २२:३०-३८). त्याला अत्यंत लाजिरवाणे मरण आले.*

**एलिया संदेष्टा** *सर्वसाधारणपणे, त्याने शिक्षण दिलेल्या संदेष्टयांच्या कृती गटाबरोबर काम करीत असे. तथापि, तो ईजबेल ह्या दुष्ट राणीपासून पळ काढण्याच्या बेतात असताना त्याने मूर्खपणा करून आपल्या सेवकाला मागेच ठेवले आणि तो एकटाच गेला. तो नाउमेद होऊन माझा आता अंत कर असे देवाला विनवू लागला (१ राजे १९).*

**येशूने** *बारा सेवकांचा एक प्रेषितीय चमू तयार केला. पुढे पेत्र ह्या चमूचा पुढारी झाला. येशूला अटक झाल्यानंतर त्यांची पांगापांग झाली. त्यांच्यापासून वेगळे झाल्यावर पौलाने येशूची ओळख नाकारली (मार्क १४:६६:७२).*

**पौल,** *तुरूंगातील वास्तव्य सोडले तर. त्याने इतर सहकाऱ्यांबरोबरच प्रवास केला. त्याचा सहकारी तीत त्याच्याबरोबर सुवार्ता सांगायला नव्हता तेव्हा त्याला उदासवाणे वाटले (२ करिंथ २:१२-१३). मग,तीत कृती गटात येऊन सामील झाला तेव्हा त्याच्या जीवात जीव आला (२ करिंथ.७:५-७).*

*ख्रिस्त आणि प्रेषित ह्यांनी सर्वसाधारणपणे एकेकट्याने काम केले नाही तर त्याऐवजी त्यांनी* **तात्पुरते गट** *स्थापन केले.*

- *गट कृतीगट होते, निश्चित कार्यावर त्यांचे लक्ष केंन्द्रित होते.*
- *काम संपल्यावर ते पुढे जात, त्यांचे सहकारी वरचेवर बदलले जात.*
- *त्यांनी आपल्या गटांतील सभासदांना शिकवून तयार केले आणि त्यांना त्यांचे गट तयार करण्यास सांगितले.*

### १क) अंत्युखिया चमू (बर्णबा, पौल आणि काही काळासाठी, योहान मार्क)

*प्रेषितीय कृती गट कसा स्थापन झाला आणि त्यांनी काय केले ते* **प्रे.कृ.१३ व १४** *ह्या अध्यायांमध्ये वाचा.*

- *अंत्युखियातील मंडळी ही पाठवणारी मंडळी व्हावी ह्यासाठी त्यांना मदत व्हावी म्हणून देवाने काय केले ते प्रे.कृ.१३:१-३ ह्या वचनांत पाहा.*
- *कृती गटाला विरोध करणारे निरनिराळे लोक आणि त्याचे परिणाम हे प्रे.कृ.अध्याय १३ व १४ मध्ये पाहा.*
- *कृती गटाने नव्या मंडळयांमध्ये पुढारी कसे तयार केले ते प्रे.कृ. अध्याय १४ मध्ये पाहा.*
- *पाठवणाऱ्या मंडळीला त्यांनी आपल्या कामाची माहिती कशा प्रकारे दिली ते प्रे.कृ.१४:२६-२८ घ्या वचनांत पाहा.*

### २. सहकाऱ्यांशी चर्चा करून आठवड्यामध्ये एकत्रित काम करणार्या चमूंची आखणी करा.

- *देवाने इफिस.४:११-१२ ह्या वचनात अभिवचन दिल्या प्रमाणे, तुमच्या मंडळीचे प्रेषित म्हणून सेवा करण्यास दिलेल्या सेवकांची तयारी करून घेण्यासाठी साहाय्य मिळावे म्हणून प्रार्थना करा (प्रेषित म्हणजे पाठवललें जे दुर्लक्षित लोकांकडे जातात.)*
- *तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करा. ते तुमच्यामध्ये बर्णबाप्रमाणे आहेत. बर्णबाने पौलाला सेवेची सुरुवात करण्यास मदत केली तसेच त्याची मंडळी पाठवणारी मंडळी व्हावी म्हणूनही साहाय्य केले. त्यांच्यावर हात ठेवून प्रार्थना करा.*
- *प्रेषितीय चमू होण्यासाठी इतर मंडळयांशी सहकार्य करा.*
- *शेफर्डस् स्टोरीबुकच्या (पौल-तीमथी पुढारी प्रशिक्षण) सहाय्याने मंडळी रोपण करणाऱ्या नव्या लोकांना प्रशिक्षण द्या.*

### ३. सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासने विषयी योजना आखा.

*बर्णबाच्या शीलस्वभावाचे* **वर्णन करा** *आणि देवाने एक चमू तयार करण्यासाठी त्याचा कसा उपयोग करून घेतला ते सांगा (वर भाग १ अ मध्ये दिले आहे)*

**तुलना करा** *एकजूटीने आणि वैयक्तिकपणे केलेले प्रयत्न (वर भाग १ ब मध्ये दिले आहे.)*

*अत्युंखियामधील चमू कसा स्यापन झाला आणि त्याने काय काम केले हे सांगा किंवा त्याचे छोटेसे नाटुकले करा (वर भाग १ क मध्ये दिले आहे.)*

*तुमच्या मंडळीतील कोणताही कृती गट नुकताच बाहेर इतरांना येशूची सुवार्ता सांगण्यासाठी वा नवीन मंडळी सुरु करण्यासाठी गेला असेल तर त्यांच्या कार्याचा* **वृत्तांत** *ऐका.*

**मुलांना** *त्यांनी तयारी केलेल्या गोष्टींचे सादरीकरण करू दया.*

*आठवड्यामध्ये तुम्ही आखलेल्या कार्यक्रमांची* **माहिती द्या** *(वर भाग २ मध्ये दिले आहे.)*

*प्रभुभोजनाचा विधी सुरु करण्यापूर्वी, प्रत्येकाला आपआपली पातके वैयक्तिकपणे देवाजवळ कबूल करण्यास सांगा. मग कोणाला तरी गणना ९:१-१४ ह्या शास्त्रभागातील वृत्तांत सांगण्यास सांगा आणि वल्हांडणाचे भोजन तसेच त्याला समांतर असलेले प्राचीन इस्राएल लोकांमधील प्रभुभोजन ह्यांचे महत्व समजावून सांगा.*

*दोन अथवा तीनजणांचे गट तयार करा. त्यांनी एकमेकांसाठी प्रार्थना करावी, सल्ला मार्गदर्शन द्यावे किंवा कोणाचे चुकत असेल तर त्याची चूक दुरुस्त करावी. तुमच्या मंडळी रोपणाच्या चमूंसाठी प्रार्थना करा.*

*पाठ करा नीतिसूत्रे ११:१४*



*पहिल्या सुवार्ता फेरीवर जाण्यासाठी पौल व बर्णबाने योहान मार्कचे स्वागत केले.*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net